माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील
अपील क्रमांक : २४९५/२०२२

अपिलार्थी, श्री.नरेशकुमार स्वरुपचंद जैन,
मु.पो.ता.देवरी, जि.गोंदिया ४४१९०१

विरुध्द

जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती,
ता.जि.अमरावती

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, ता.जि.अमरावती

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २५.०१.२०२४

अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १५.०४.२०२२ | १८.०५.२०२२ | २१.०५.२०२२ | १९.०७.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १५.०४.२०२२** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " (१) दि.०३.०१.२०२२ रोजीच्या तक्रार अर्जाची नोंद जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथील आस्थापना शाखेतील आवक नोंदवहिच्या ज्या पानावर करण्यात आली त्या पानाची प्रत आवक क्रमांक व दिनांकासह, (२) दि.०३.०१.२०२२ रोजीच्या तक्रार अर्जावर जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडून करण्यात आलेली कार्यवाही, (३) दि.०३.०१.२०२२ रोजीच्या तक्रार अर्जावर जिल्हाधिकारी अथवा त्यांच्या कार्यालयाद्वारे संबधितांना चौकशी करुन अहवाल सादर करण्यास ज्या पत्राचे अनुषंगाने कळविण्यात आले त्या पत्राची प्रत, (४) दि.०३.०१.२०२२ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने संबंधिताकडून जिल्हाधिकारी अथवा त्यांच्या कार्यालयामध्ये सादर करण्यात आलेल्या चौकशी अहवालाची प्रत सर्व संलग्न करण्यात आलेल्या सहपत्रासह, (५) सदर प्रकरणाचा संबंधितांकडून आलेल्या चौकशी अहवालाची नोंद आवक नोंदवहीच्या ज्या पानावर करण्यात आली त्या पानाची प्रत, (६) सदर प्रकरणात जिल्हाधिकारी यांचेवतीने करण्यात आलेली अंतिम कार्यवाहीची माहिती " मागितलेली आहे. सदर माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत अपीलार्थीस दि.१८.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, मागितलेल्या माहितीचा बोध होत नसल्याने सदर प्रकरणी आपण स्वत: या कार्यालयास शासकीय कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे

जेणेकरुन आपणास माहिती पुरविने सोईचे होईल, असे लेखी सूचीत केले. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक २१.०५.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती विहीत मुदतीत पुरविली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १९.०७.२०२२ रोजी सुनावणी घेऊन "अपिलार्थी यांचा मुळ अर्ज न मिळाल्यास अपिलार्थी यांना अर्जाची दुसरी प्रत सादर करण्याबाबत सूचीत करण्यात यावे व जोडपत्र-अ नुसार अपिलार्थी यांचा अर्ज निकाली काढण्यात यावा." असे नमुद करुन आदेश पारीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नूसार आयोगाकडे **दिनांक ०१.०८.२०२२ रोजी** " जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ मध्ये मागितलेली माहिती न पुरविता चुकीची कार्यवाही केलेली आहे. " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २५.०१.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.निलेश खटके व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी श्री.उमेश खोडके हे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी विजया उगले व श्री.सुधीर चवाणे हे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलकर्ता श्री.नरेशकुमार जैन यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाचे अनुषंगाने प्रस्तुत अर्ज हा सिलबंद स्वरुपात आर एम ४५०७३४६० आय एन या स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि.०३.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला असून सदर बंद पाकिट जिल्हाधिकारी यांचे स्विय सहाय्यक यांचेकडे दि.०३.०१.२०२२ रोजी सादर केलाअसून बंद पाकिटाची नोंदवही देखील सादर करण्यात आलेली आहे. सदर अर्ज हा त्यानंतर आवक जावक शाखेत वाटपाकरिता प्राप्त झाला नसल्यामुळे व इतर कोणत्याही शाखेत कार्यवाहीकरिता वाटप करण्यात आला नसल्याने सदर अर्जावर पुढे काय कार्यवाही झाली याचा कुठलाही तपशील कलम २ (च) प्रमाणे कार्यालयीन अभिलेखावर दस्तावेज स्वरुपात उपलब्ध नाही. अपिलार्थी श्री.जैन यांचेशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी संपर्क केला असता, त्यांनी संबंधित गोपनिय पत्राची माहिती देण्यास जन माहिती अधिकाऱ्यास नकार दिला असल्याचाही खुलासा यात आढळून येतो. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्याच्या अर्जाची दुसरी प्रत सादर करण्याविषयी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले असून वरील अर्ज हा प्राप्त झाल्यानंतरच त्यावर कुठली कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याचा तपशील शोधण्यास मदत होईल, असे नमूद केले. या प्रकरणी अपिलार्थी यांनी सादर केलेले सिलबंद पाकिट हे तत्कालीन जिल्हाधिकारी अमरावती यांना ज्या दिवशी वरील पत्र जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले त्याच दिवशी म्हणजे दि.०३.०१.२०२२ रोजी सादर करण्यात आले असून याबाबतीत माहिती अधिकार अर्जावर अपिलार्थी यांना बंदपाकिट नोंद केलेल्या पुस्तिकेची छायांकित प्रत देखील संलग्न करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देखील माहिती अधिकार अधिनियमाशी संयुक्तीक असाच निर्णय दिला असल्याचे आढळून येते. त्यामुळे प्रस्तुत प्रथम अपीलात नमूद केल्याप्रमाणे जर अपिलार्थी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना प्रदान केलेल्या अर्जाची प्रत सादर केल्यास

त्यावर नेमकी कुठली कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबतीत माहितीचा शोध घेण्यास मदत होईल. ही सूचना स्विकार्य असल्यास विद्यमान जन माहिती अधिकरी यांचेशी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे संपर्क साधल्यास माहिती प्राप्त करुन घेता येईल. या सूचनेसह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०१.२०२४**

जावक क्रमांक ८८८३६ दिनांक 02 APR 2024